पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 03/01/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :– दिनांक 02/01/2020 चे 18.40 वा. दरम्यान 21 वर्षीय फिर्यादी/पीडित ही गावातील परमात्मा एक कार्यक्रमात जेवन करन्याकरीता आई सोबत गेली होती. पीडित ही जेवन करून परत येतांनी यातील आरोपी नामे– राहुल प्रभाकरजी ढोबळे, रा. कोपरा, ता. मौदा याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेस मर्डर करण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख 9922447045 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 01/01/2020 चे 20.30 वा. दरम्यान 17 वर्षीय फिर्यादी/पीडित घरी हजर असतांना आरोपी नामे– अभिषेक उर्फ अभिनेश वर्मा, वय 25 वर्ष, रा. येरला हा तिच्या घरासमोर जाउन तिला आवाज देउ लागला. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व आरोपीने पीडितेस पळून नेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 506 भादंवी. सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक चौरे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर